दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४०३ वा • शुक्रवार, ता. १२ सप्टेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



## महाराष्ट्र उद्योग-गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम ठिकाण आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

''इज ऑफ डुईंग बिझनेस'' अंतर्गत गुंतवणूकदार आणि उद्योजकांना पोषक वातावरण देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले. जिओ वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (IABCA) ग्लोबल लीडर्स फोरम आणि सीईओ राऊंडटेबल परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल, ऑस्ट्रेलियाचे उच्चायुक्त फिलीप ग्रीन, उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन यांच्यासह विविध उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाने गुंतवणूक सुलभ करण्यासाठी विविध नवीन धोरणांची आखणी सुरू केली असून येत्या काळात १४ क्षेत्रांसाठी धोरणे जाहीर करण्यात येणार आहेत.

त्यामध्ये सेवा क्षेत्राचाही समावेश आहे. उद्योजकांना कोणतीही अडचण न येता सर्व परवानग्या जलदगतीने मिळाव्यात यासाठी 'मैत्री पोर्टल'ची निर्मिती करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या परिषदेच्या माध्यमातून भारत-ऑस्ट्रेलिया व्यापार आणि गुंतवणूक सहकार्याला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भारतीय बॉक्सिंगला पहिले पदक निश्चित

### नुपूर श्योरनची विश्वचषकात दमदार कामगिरी

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारताच्या नुपूर श्योरन हिने बॉक्सिंग वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ मध्ये अप्रतिम कामगिरी करत महिला हेवीवेट (+८० किलो ऑलिम्पिक) गटात भारतासाठी पहिले पदक निश्चित केले आहे.

उपांत्यपूर्व फेरीत तिने उझबेकिस्तानच्या ऑल्टिनॉय सोतीम्बोएवा हिला ४-१ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने पराभूत करत सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. या विजयानंतर भारताच्या पदक तालिकेत आता किमान कांस्यपदक निश्चित झाले असून, सेमीफायनल व फायनलमध्ये अजून मोठ्या यशाची संधी आहे. श्योरनच्या दमदार पंचांनी सामन्यात सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले.



निर्णायक फेरीत तिच्या वेगवान व अचूक स्ट्राईक्समुळे सोतीम्बोएवा बचावावर गेली आणि पंचांनी ४-१ असा निकाल भारताच्या बाजूने दिला.

भारतीय बॉक्सिंगला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवा आत्मविश्वास देणारी ही कामगिरी ठरत आहे. नुपूर श्योरनच्या या विजयाबद्दल क्रीडा क्षेत्रात कौतुकाची लाट उसळली असून, तिच्या पुढील लढतीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.



### मराठा समाजाचा ठराव

## जनगणनेत 'मराठा, उपजात कुणबी' असा उल्लेख करा

**बंगळुरू । श्रीकांत काकतीकर**

बेंगळुरू येथे मराठा समाजातील प्रमुख मान्यवरांची महत्वपूर्ण बैठक गोसाई मठाचे स्वामी श्री मंजुनाथ स्वामीजी यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत कर्नाटकातील मराठा समाजाच्या हितोन्नतीसंदर्भात ठोस निर्णय घेण्यात आले. बैठकीला आमदार श्रीनिवास माने, विधानपरिषद सदस्य डॉ. मारुतीराव मुळे, कर्नाटक सरकारचे मंत्री संतोष लाड, माजी मंत्री पी.जी.आर. सिंधिया, कर्नाटक राज्य क्षत्रिय मराठा परिषदेचे अध्यक्ष सुरेशराव साठे, समाजनेते शामसुंदर गायकवाड, केसरकर, बेळगाव मराठा समाजाचे युवा नेते किरण जाधव, तसेच समाजबांधव नागेश देसाई, विनायक कदम, धनंजय जाधव यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्यात लवकरच सुरू होणाऱ्या जातीय जनगणनेत मराठा बांधवांनी मातृभाषा रकान्यात 'मराठी', धर्म रकान्यात 'हिंदू' आणि जात रकान्यात 'मराठा व उपजात कुणबी' असा उल्लेख करावा, असा ठराव या बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला. याशिवाय समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक प्रगतीसाठी ठोस उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. जिल्हा व तालुका पातळीवर जनजागृती बैठका घेण्याचा, तसेच गावागावांत परिपत्रके वाटप करून ही माहिती पोहोचविण्याचा निर्णय घेण्यात आला. किरण जाधव यांनी या ठिकाणी भाष्य करताना, ''जातीय जनगणना २२ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. जनजागृतीसाठी आपल्याकडे कमी वेळ आहे. म्हणून जिल्हावार व तालुकावार बैठकांचे आयोजन करून संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे'' असे मत व्यक्त केले. या बैठकीला उपस्थित मान्यवरांमध्ये मंजुनाथ स्वामीजी, आमदार श्रीनिवास माने, विधानपरिषद सदस्य डॉ. मारुतीराव मुळे, मंत्री संतोष लाड, माजी मंत्री पी.जी.आर. सिंधिया, सुरेशराव साठे, शामसुंदर गायकवाड, केसरकर, किरण जाधव, नागेश देसाई, विनायक कदम, धनंजय जाधव यांचा समावेश होता.



## रस्ता रुंदीकरणास अडथळा; २२ दुकानांवर बुलडोझर

**म्हापसा । रयत समाचार**

गौरावाडा-कळंगुट येथे बेकायदेशीरपणे विस्तार करून अतिक्रमण केलेल्या आणि रस्ता रुंदीकरणात अडथळा निर्माण करणाऱ्या २२ दुकानांवर बुलडोझर फिरवण्यात आला. गुरुवारी न्यायालयाच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली. मात्र कारवाईपूर्वी पंचायतीने विश्वासात घेतले नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला. पंचायतीच्या सर्व्हेत २३ व्यावसायिकांनी बेकायदेशीरपणे दुकानांचा विस्तार केल्याचे आढळले होते. त्यांना सुरुवातीला नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यानंतर कारवाईबाबत स्वतंत्र नोटीस देण्यात आली होती. त्यापैकी कळंगुट येथील चार दुकाने जेसीबीच्या मदतीने हटवण्यात आली. व्यावसायिकांनी न्यायालयात धाव घेतली होती, त्यापैकी एकालाच स्थगिती मिळाली. परिसरातील काहींनी फूटपाथवर केलेली अतिक्रमणे देखील हटवण्यात आली. कारवाई झालेल्या बांधकामांमध्ये विस्तारित दुकाने, शौचालये आणि लहान खोल्यांचा समावेश आहे. गुरुवारी सकाळपासून सुरू झालेल्या या कारवाईवर पंचायत, मामलेदार कार्यालय आणि गटविकास कार्यालयातील अधिकारी उपस्थित राहून देखरेख ठेवत होते. यावेळी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कारवाई शुक्रवारपर्यंत सुरू राहणार आहे. पंचायतीचे सचिव अर्जुन वेळीप म्हणाले की, ''ही बांधकामे रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरत होती. सुनावणी घेतल्यानंतर संबंधितांना नोटिसा पाठवून ही कारवाई करण्यात आली आहे. कळंगुट हे पर्यटनस्थळ असल्याने येथील रस्त्यांचे रुंदीकरण गरजेचे आहे. भविष्यात इतर बेकायदेशीर बांधकामांवरही नोटिसा बजावून कारवाई केली जाणार आहे.



## राज्यात लवकरच आधुनिक क्रीडाधोरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**बारामती । रयत समाचार**

राज्यातील क्रीडा संस्कृतीचा दर्जात्मक विकास साधण्यासाठी आणि खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करता यावी, यासाठी नव्या क्रीडा धोरणाची आखणी करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. कटफळ (ता. बारामती) येथे झालेल्या क्रीडा विभागाच्या आढावा बैठकीत बारामतीसाठी प्रस्तावित जिल्हा क्रीडा संकुलाच्या आराखड्यांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व क्रीडा संकुले अद्ययावत करण्यावर भर दिला. खेळाडूंना सर्व सोयी-सुविधा, आधुनिक साधन-सामग्री उपलब्ध करून देणे आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळावे, यासाठी ठोस उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बैठकीत विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल समित्यांची पुनर्रचना करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच वेगवेगळ्या देशांतील आणि भारतातील विविध राज्यांमधील क्रीडा सोयी-सुविधांचा अभ्यास करून महाराष्ट्रात त्यांचा अवलंब कसा करता येईल, यावरही चर्चा झाली. याशिवाय सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) व सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) यांचा क्रीडा क्षेत्रात प्रभावी उपयोग करण्यावर भर देण्यात आला. क्रीडा क्षेत्रात नवी ऊर्जा निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## धरणातील गाळ काढणीस गती

### साठवण क्षमता वाढीसाठी मंत्री विखे-पाटील यांचे निर्देश

**मुंबई । रयत समाचार**

धरणांतील गाळ काढल्यामुळे धरणांची पाणी साठवण क्षमता वाढून पूर नियंत्रणालाही हातभार लागतो. त्यामुळे या कामाला प्राधान्य द्यावे व तातडीने प्रस्ताव सादर करावेत, असे स्पष्ट निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले. धरणातील गाळ काढणी संदर्भातील प्रस्तावाच्या सद्यस्थितीचा आढावा मंत्री विखे-पाटील यांनी नुकत्याच घेतलेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी



संचालक श्री. गुणाले, गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता तथा सहसचिव प्रसाद नार्वेकर, संजीव टाटू, अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे आदी अधिकारी उपस्थित होते. मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले की, धरणातील गाळ काढल्यास पाणीसाठा क्षमता वाढतेच, पण पुराच्या काळात अतिरिक्त पाण्याचा दाब नियंत्रित ठेवण्यासही मदत होते. त्यामुळे या उपक्रमासाठी प्रशासनाने वेळ न घालवता तातडीने प्रस्ताव सादर करून कामास सुरुवात करावी. धरणे सुरक्षित, साठवण वाढणार; शेतकऱ्यांना दिलासा मिळणार.

## नवी दिल्लीतील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची परिषद



### देशव्यापी सखोल पुनरावलोकन मोहिमेच्या तयारीचे परीक्षण

**नवी दिल्ली रयत समाचार**

भारत निवडणूक आयोगाने (ECI) देशभरात होणाऱ्या सखोल पुनरावलोकन मोहिमेच्या (SIR) तयारीचे मूल्यमापन करण्यासाठी सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची (CEO) परिषद नवी दिल्ली येथे आयोजित केली. यपरिषदेचे उद्घाटन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हस्ते झाले. यावेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीरसिंग संधू व डॉ. विवेक जोशी उपस्थित होते. परिषदे दरम्यान सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयांच्या एसआयआर तयारीचे सविस्तर परीक्षण आयोगामार्फत करण्यात आले. आयोगाने या परिषदेत निवडणुकीतील पारदर्शकता, मतदार याद्यांची शुद्धता, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे जनतेचा सहभाग वाढविण्याच्या मुद्द्यांवरही भर दिला. या बैठकीत निवडणूक व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक ती कार्ययोजना आखण्यात आली.

## लोकलेखा समितीचे सदस्य गेले येरवडा कारागृहात

### सुरक्षा, सुविधा, क्षमता, जेवणासह आरोग्य व्यवस्थेची केली पाहणी

**पुणे । रयत समाचार**

कारागृह म्हणजे सामान्यांच्या मनात भीती निर्माण करणारी जागा. मात्र पुण्यातील ऐतिहासिक येरवडा कारागृह हे फक्त शिक्षा भोगण्याचे ठिकाण नसून, भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासाचे साक्षीदार ठरलेले आहे.




लोकलेखा समितीचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या सदस्यांनी येरवडा कारागृहास भेट देऊन तेथील सुरक्षा, सुविधा, क्षमता, बंद्यांची संख्या, जेवणाची व आरोग्य व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली, अशी माहिती कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी दिली. यावेळी कारागृहातील सर्व व्यवहार कारागृह नियमावलीनुसारच पार पडले पाहिजेत, यावर विशेष भर देत समितीने सविस्तर चौकशी केली. बंद्यांच्या अडचणी, प्रशासनातील सुधारणा आणि आवश्यक त्या सोयीसुविधांची नोंद समितीने केली. या कारागृहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आजही तितकीच दैदिप्यमान आहे. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान विभूतींना स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानामुळे येथे कारावास भोगावा लागला होता. समिती सदस्यांनी त्या कोठड्यांनाही भेट दिली आणि स्वातंत्र्याच्या अमूल्य वारशाची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. ''स्वातंत्र्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी यातना सोसल्या, त्याग केला, तेव्हाच आपण आजचा मुक्त श्वास घेऊ शकतो. येरवडा कारागृहाची भिंत आजही त्या संघर्षाची साक्ष देते,'' असे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. लोकलेखा समितीची ही पाहणी केवळ प्रशासकीय तपासणीपुरती मर्यादित न राहता, स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागास भावपूर्ण अभिवादन करणारी ठरली.

## कामगार चळवळीचे ज्येष्ठ नेतृत्व कॉम्रेड एम.ए.पाटील यांचे निधन

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

कामगार चळवळीतील प्रखर लढवय्या आणि सर्व श्रमिक संघ महाराष्ट्र राज्याचे प्रणेते कॉम्रेड मारुती आबा पाटील (एम. ए. पाटील) यांचे आज, ११ सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे मुंबईतील निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. ते वयाच्या ७८८०व्या वर्षीही सक्रिय राहून कामगार चळवळीत कार्यरत होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ ते संघटनेचे अध्यक्ष व मार्गदर्शक होते. कॉम्रेड पाटील यांनी १९७० च्या दशकापासून सर्व श्रमिक संघात पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले. वाळू उपसा कामगार, रोलिंग मिल कामगार, कोतवाल, वनकामगार, ऊसतोड कामगार, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी आणि शासनाच्या बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांना संघटित करून त्यांचे हक्क मिळवून दिले. त्यांच्या प्रयत्नांतून बांधकाम व वन विभागातील शेकडो कर्मचारी कायमस्वरूपी सेवेत रुजू झाले. अंगणवाडी आणि आशा कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्तींमध्ये सुधारणा तसेच वेतनवाढीसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. कोरोना काळात, वयोमानाचा विचार न करता, त्यांनी मंत्रालयात जाऊन संबंधित मंत्र्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून कर्मचाऱ्यांचे पगार नियमित ठेवण्यास मोठा वाटा उचलला. गेल्या आठवड्यापर्यंत ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आणि संघटनात्मक कामकाजात व्यस्त होते.



त्यांच्या निधनाने कामगार चळवळीचे मोठे नुकसान झाले असून, सर्व श्रमिक संघ तसेच विविध कामगार संघटनांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी म्हणाले, ''कॉम्रेड पाटील यांनी असंघटित व दुर्लक्षित कामगारांना आवाज दिला. त्यांचे योगदान विसरणे अशक्य आहे.'' कॉम्रेड पाटील यांना लाल सलाम अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

# ‘ये शाम मस्तानी, मदहोश किये जाये’ लाईव्ह गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन

**अहमदनगर | आबीद खान**

शहरातील संगीतप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी ठरणारा ‘‘गोल्डन रेट्रो मेलोडीज एव्हरग्रीन हिट्स’’ हा भव्य लाईव्ह म्युझिकल ऑर्केस्ट्रासह जुन्या गीतांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. ९०’ज टॉकीज क्लबच्या वतीने हा कार्यक्रम शनिवार, ता. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९.३० या वेळेत माऊली संकुल, सावेडी रोड, अहमदनगर येथे होणार असल्याची माहिती डॉ. दमण काशीद यांनी दिली. ७०-८० च्या दशकातील जुन्या हिंदी चित्रपट संगीताची मोहिनी पुन्हा अनुभवायला मिळणार असून या कार्यक्रमात अविस्मरणीय गाण्यांच्या सुरावटींनी रसिक मंत्रमुग्ध होणार आहेत.



कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन डॉ. दमण काशीद व प्रशांत बंडगर यांनी केले आहे. प्रमुख गायक म्हणून डॉ. दमण काशीद आणि डॉ. गायत्री कुलकर्णी रसिकांना भावमधुर प्रवास घडवतील. त्यांच्यासोबत विद्या तन्वर, डॉ. सत्तार सय्यद, डॉ. मनोज घुगे, प्रशांत बंडगर, संजय माळवदे, राजेंद्र शहाणे, श्रीपाद शहाणे, रोनित सुखधन, कु. आराधना गायकवाड, सुनीता धर्माधिकारी आदी गायक कलाकार सहभागी होणार आहेत. या सोहळ्यासाठी तब्बल २० वादक कलाकारांचा सहभाग असून त्यामध्ये श्रीकांत गडकरी (ऑक्टापॅड/रिदम मशीन), सनी गायकवाड (ढोलक), अमित सालवे (कॉंगो/ढोलक), अभिजीत शर्मा (ड्रमसेट), सिद्धार्थ थट्टे (तबला), नितीन शिंदे (ट्रिपलॅड/डफ), सुधीर सोनवणे (फ्लूट), संकेत देहडे (लीड गिटार), प्रकाश लगड (बेस गिटार), महेश गुरव (सॅक्सोफोन), दिलावर शेख (सिंथेसायझर), राजेश देहडे (कीबोर्ड), नरेन साळवे, गिटार टीम प्रियंका पवार, आदिती राऊत, ग्रेसी डायमरी, मृणाल पालवे, शर्वरी मरकड, ट्रंपेट विलास गुरव, कोरस राजू कुलकर्णी, सुनील चांदणे, रोज जगताप, अश्विनी वैद्य, पर्कशनिस्ट विनोद पंडित, साऊंड सिस्टिम हरमन ऑडिओ (ब्रिजेश बजाज), लाईट सिस्टिम हरमन लाईट्स (जीतू बजाज) आदी नामवंत कलाकारांचा सहभाग राहणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश पाटोळे, डॉ. सचिन काकडे व डॉ. अविनाश वारे करतील. हा भव्य संगीत सोहळा डॉ. दमन काशीद हॉस्पिटल यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून कार्यक्रमाचे व्यवस्थापन ॲड. चंदनशिव, महेश घावटे, सुशिल देठे, सचिन परदेशी, अजित रोकडे, प्रा. सारीका रघुवंशी, महानुर व डॉ. कंगे यांनी केले आहे. रसिकांसाठी प्रवेश मोफत असून पास आवश्यक आहे. इच्छुकांनी ज्ञानेश्वर माने (मो. ७३५०८८१५१५) व महेश घावटे (मो. ८९५६३६३६६८) यांच्याशी संपर्क साधावा. नगरकर रसिकांना जुन्या हिंदी गाण्यांचा सुरेल खजिना पुन्हा अनुभवण्याची सुवर्णसंधी लाभणार असून कार्यक्रमाला उपस्थित राहून सुरांच्या या जादुई सोहळ्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन प्रशांत बंडगर यांनी केले आहे.



# नंदीवाले-तिरमली समाजाचा आरक्षणासाठी १८ सप्टेंबरला मोर्चा

**अहमदनगर | रयत समाचार**

नंदीवाले आणि तिरमली समाजाला सातारा गॅझेटनुसार अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीसाठी येत्या गुरुवारी, ता. १८ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर शहरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी नुकतीच शासकीय विश्रामगृहात बैठक पार पडली.


या बैठकीस छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे अध्यक्षस्थानी होते. बैठकीत ठरविण्यात आले की, नंदीवाले आणि तिरमली हे समाज प्रत्यक्षात एकच असून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चाचे नियोजन नंदीवाले-तिरमली समाजाचे सुभाष काकडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तसेच शहरातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे आणि विनोद साळवे यांनी केले आहे.. रावसाहेब काळे म्हणाले की, ‘‘नंदीवाले आणि तिरमली समाजाला सातारा गॅझेटनुसार आरक्षणाचा लाभ तातडीने देणे गरजेचे आहे. शासन दरबारी अनेक वेळा मागण्या केल्या तरीही याबाबत ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे समाजातील तरुणाई आणि पुढील पिढीच्या भविष्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने लढा उभारणे गरजेचे आहे. १८ सप्टेंबरचा मोर्चा हा केवळ हक्कासाठीचा संघर्ष आहे,’’ असे त्यांनी स्पष्ट केले.. या महत्त्वपूर्ण बैठकीस समाजातील आणि संघटनेतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये बाबुराव फुलमाळी, बाबू काकडे, सुरेश काकडे, गुलाब काकडे, उत्तम फुलमाळी, संजय फुलमाळी, भीमा औटी, राजू आव्हाड, श्रीधर शेलार, विलास काकडे यांचा समावेश होता.

# प्रभाग रचनेनंतर नव्या आघाड्या? शहरात चर्चांना उधाण

**अहिल्यानगर | रयत समाचार**

येऊ घातलेल्या अहिल्यानगर महानगर पालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाली असून, त्यानंतर शहरातील राजकीय वातावरणात चांगलीच खळबळ उडाली आहे. इच्छुक उमेदवारांनी तातडीने आपल्या प्रभागाचा नकाशा आणि छायाचित्रांसह पोस्ट सोशल मीडियावर शेअर करण्यास सुरुवात केली आहे. प्रभाग रचनेत आमदार जगताप यांच्या समर्थकांचा भाग तुलनेने सेफ झोनमध्ये दिसत असला तरी विरोधकांच्या अनेक वॉर्डांची तोडफोड



झाल्याचे स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, शिंदे गटालादेखील या नव्या रचनेचा फटका बसल्याचे जाणवते. यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि भाजपकडून शिंदे सेनेला अडचणीत आणण्याची तयारी सुरू आहे का, अशी चर्चा शहरभर रंगत आहे. दुसरीकडे, विरोधी ठाकरेंची शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गट पुढील रणनीती काय आखणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मात्र, सूत्रांच्या माहिती नुसार शहरात अनपेक्षित शहर विकास आघाडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काळात नेमके काय घडणार याकडे नगरकरांचे लक्ष लागले आहे.येणाऱ्या मनपा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी आणि पक्षांतर घडण्याची चिन्हे स्पष्ट दिसत असून, राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अहमदनगर महाविद्यालयात ‘चले जाव’ निमित्त वक्तृत्व स्पर्धा

**अहमदनगर | रयत समाचार**

अहमदनगर महाविद्यालय गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ‘चले जाव’ (क्विट इंडिया मूव्हमेंट) निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा आज प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग, विनाअनुदानित विभाग मुख्य समन्वयक प्रा. डॉ. रज्जाक सय्यद आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुधीर वाडेकर यांच्या हस्ते विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. सिद्धी नागपुरे (सांख्यिकी विभाग), द्वितीय क्रमांक कु. इकरा फातिमा, तृतीय क्रमांक कु. अक्षदा ढसाळ यांनी मिळवला, तर उत्तेजनार्थ



पुरस्कार केशव गौड याला देण्यात आला. सर्व विजयी व सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी सांगितले की, वक्तृत्व स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरते. गांधी अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने उपलब्ध करून दिलेले हे व्यासपीठ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल. उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग यांनी वक्तृत्व हे एक नैसर्गिक कौशल्य असल्याचे सांगितले. आत्मविश्वास हा सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा घटक असून, वक्तृत्व स्पर्धेतून सकारात्मक आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतो, असे त्यांनी नमूद केले. विनाअनुदानित विभागाचे मुख्य समन्वयक प्रा. डॉ. रज्जाक सय्यद यांनी आपल्या भाषणात या उपक्रमाचे कौतुक केले. वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कला आणि कौशल्याला वाव मिळतो व युवकांनी ही संधी मोठ्या प्रमाणात घ्यावी, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुधीर वाडेकर, प्रा. आकांक्षा नवले, प्रा. भास्कर कसोटे यांची उपस्थिती लाभली होती. तसेच महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. विलास नाबदे यांनी सर्वांचे आभार मानले.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत आनंद विद्यालय विजयी



**अहमदनगर | रयत समाचार**

मनपा आयोजित जिल्हास्तरीय कब्बडी स्पर्धेत आनंद विद्यालयाच्या १४ वर्षीय मुलींच्या संघाने अतुलनीय कामगिरी करत अंतिम फेरीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय विजयामुळे संघाची विभागीय स्तरावर निवड झाली असून शाळेच्या इतिहासात आणखी एक अभिमानाचा क्षण नोंदवला गेला आहे. या विजयानंतर संस्थेचे सचिव किसन तरटे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. अष्टेकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संघाचे अभिनंदन केले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंना श्री. भूतकर, श्री. विकास घोलप, श्री. माने व श्री. लबडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे आणि खेळाडूंच्या चिकाटीमुळे हा विजय साध्य झाल्याचे शाळेकडून सांगण्यात आले. आनंद विद्यालयाच्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून विभागीय पातळीवरील पुढील स्पर्धेत संघाच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पाउुलबुद्धे आयुर्वेद महाविद्यालयास NCISM ची अधिकृत मान्यता

**अहमदनगर | विजय मते**


सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे आयुर्वेद महाविद्यालय, नारायणडोहो, सोलापूर रोड, अहिल्यानगर यांना नुकतीच भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग (NCISM), आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे आयुर्वेदाच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरातच उच्च शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आले आहे.

अहिल्यानगर शहर शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून या मान्यतेमुळे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातही शहराचा लौकिक वाढला आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून अभियांत्रिकी, फार्मसी, व्यवस्थापन यांसह विविध क्षेत्रांत शिक्षणाची दारे उघडण्यात आली आहेत. आता आयुर्वेद वैद्यकीय शिक्षणाची भर पडल्याने हे संकुल बहुआयामी शैक्षणिक केंद्र म्हणून अधिक सक्षम झाले आहे. मान्यता मिळाल्यानंतर महाविद्यालयाकडून अत्याधुनिक रुग्णालय, प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, अनुभवी प्राध्यापकवर्ग तसेच संशोधनाला चालना देणारी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकच नव्हे तर प्रात्यक्षिक ज्ञान आणि संशोधन क्षेत्रात प्रगती करण्याची मोठी संधी मिळणार आहे. तसेच महाविद्यालयाच्या माध्यमातून आरोग्य शिबिरे, ग्रामीण भागातील सेवा प्रकल्प आणि आयुर्वेदाचा प्रसार करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेकडून करण्यात आला आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक :** **दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# आदिवासी प्रवर्गात बंजारा समाजाला सामावून घ्या

## पाथर्डीत मोर्चा

**पाथर्डी । नितीय गटाणी**

राज्यातील बंजारा-लमाण समाजाच्या आरक्षणाबाबत शासनाकडून केवळ वेळकाढूपणा सुरू असून, खऱ्या अर्थाने आरक्षणाची गरज असलेल्या समाजाला उपेक्षित ठेवले जात आहे. अन्य दबाव गटांसमोर शासन झुकत असल्याचा आरोप करत तालुक्यातील बंजारा समाजाच्या विविध पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला.


जुन्या बसस्थानक चौकातील स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोर्चाला सुरुवात झाली. यापूर्वी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांनाही पुष्पांजली अर्पण करण्यात आली. जोरदार घोषणाबाजी करत मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचला. यावेळी सकल बंजारा समाज व गोरसेनेच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतरही समाजाला न्याय मिळालेला नाही. इतर राज्यात संवैधानिक सवलती लाभलेल्या असताना महाराष्ट्रात मात्र बंजारा समाज सर्व सोयी-सुविधांपासून वंचित आहे.

हजारो तांडे अजूनही मूलभूत सुविधांशिवाय उपेक्षित जीवन जगत आहेत. ''आम्हाला केवळ आदिवासी प्रवर्गात सामावून घ्यावे, अन्य कोणतीही मागणी नाही,'' असे आंदोलकांनी स्पष्ट केले. तालुक्यातील अनेक तांड्यांना महसुली गावाचा दर्जा नाकारला जात असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. कष्ट करून उपजीविका करणारा समाज परराज्यात कोळसा व्यवसायासाठी जावा लागतो, अशीही खंत व्यक्त झाली.

शिक्षण, आरोग्य, शासनाच्या योजनांचा कोणताही लाभ या समाजाला मिळत नसल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा-लमाण समाज आदिवासी प्रवर्गातील असल्याचा स्पष्ट उल्लेख असून, महाराष्ट्रात मात्र हा समाज अद्यापही 'व्हीजेएनटी अ' प्रवर्गात मोडतो. त्यामुळे समाजावर अन्याय होत असल्याचे वक्ते म्हणाले. ''अन्याय किती दिवस सहन करायचा, यालाही मर्यादा आहे.

आम्ही आज शांत आहोत, पण उद्या काय करू हे कुणी सांगू शकणार नाही,'' अशा शब्दांत आंदोलकांनी इशारा दिला. या आंदोलनात प्रभाकर पवार, आर. के. चव्हाण, नवनाथ चव्हाण, अशोक चव्हाण, रामभाऊ राठोड, विजय राठोड, मोहन जाधव, मोहन पवार, सचिन पवार, अजय राठोड, श्रीकृष्ण राठोड, किशोर राठोड यांच्यासह तालुक्यातील असंख्य बांधव सहभागी झाले होते. तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी निवेदन स्वीकारले.

# स्टाफ सोसायटीच्या प्रगतीसाठी सचिवांनी पुढाकार घ्यावा- घोडेचोर



**नेवासा । विजय खंडागळे**

नेवासा तालुक्यातील ग्रामीण भागातील विकासाचा कणा समजल्या जाणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांच्या कामकाजासाठी असलेली नेवासा तालुका स्टाफ सोसायटी 'कामधेनू'च्या प्रगतीसाठी सचिवांनी पुढाकार घेऊन हक्काचे सेवा केंद्रबिंदू जिल्ह्यात प्राप्त होईल, असा आदर वाटला पाहिजे. यासाठी सचिवांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे आवाहन नेवासा तालुका सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर यांनी केले. स्टाफ सोसायटीच्या चेअरमन पदी पंडित बाबासाहेब खाटीक व व्हाईस चेअरमन पदी पत्रकार विजय खंडागळे यांची निवड झाल्याबद्दल तालुका विकास अधिकारी कार्यालय, नेवासा येथे आयोजित सभेत श्री. घोडेचोर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक होते. या प्रसंगी पंडित खाटीक व पत्रकार विजय खंडागळे यांचा सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर व जिल्हा सहकारी बँकेच्या वतीने तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. घोडेचोर म्हणाले की, विकास संस्थेत असलेल्या सचिवांची मेहनत व कष्ट हे स्टाफ सोसायटीच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असून नूतन पदाधिकाऱ्यांनी त्या दिशेने प्रयत्नशील राहावे. तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हा बँकेचे ओएस अधिकारी बी. एन. नागपुरे, अधिकारी प्रदीप राऊत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माजी चेअरमन संपत नवले यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला माजी चेअरमन बाळासाहेब पटारे, संदीप आदमाने, नेवासा तालुका सचिव संघटनेचे अध्यक्ष भारत पाटील, संभाजी चव्हाण, बाळासाहेब दिघे, विठ्ठल खाटीक, इथापे, बाबासाहेब देशमुख, स्टाफ सोसायटीचे व्यवस्थापक सुभाष सरोदे, बाळासाहेब गडाख, भगवान आंबिलवादे, सतीश पंडुरे आदी मान्यवर उपस्थित होते. आभार तालुका सचिव आप्पासाहेब बोर्डे यांनी मानले. सचिव संघटनेच्या महत्त्वाच्या विविध प्रश्नांची तळमळीने व मनापासून सर्वांगीण विकासासाठी शासन पातळीवर न्याय मिळवून दिल्याबद्दल सहाय्यक निबंधक श्री. घोडेचोर यांचा अभिनंदनाचा ठराव घेऊन कौतुक करण्यात आले.

# पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे मोहटादेवी गडावर

**पाथर्डी । नितीन गटाणी**



नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर भेट देऊन देवीची आरती केली तसेच सुरक्षा व्यवस्था व बंदोबस्ताचा आढावा घेतला. शारदीय नवरात्र महोत्सवाचा प्रारंभ सोमवार, ता. २२ सप्टेंबर २०२५ रोजी होत आहे. यंदा राज्यभरात समाधानकारक पाऊस झाल्याने भाविकांची विक्रमी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर बंदोबस्त, वाहनतळ, दर्शनमार्ग व अतिक्रमणांची पाहणी करून पोलीस अधीक्षक घार्गे यांनी संबंधित यंत्रणेला विविध सूचना केल्या. या वेळी उपविभागीय अधिकारी गणेश उगले, पोलीस निरीक्षक विलास पुजारी उपस्थित होते. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी आवश्यक बंदोबस्ताविषयी माहिती दिली तसेच मागील वर्षाच्या तुलनेत वाढीव बंदोबस्ताची मागणी केली. गड परिसराची पाहणी करून मंदिर प्रशासनाशी चर्चा करताना घार्गे म्हणाले की, यंदा गस्ती पथकासोबत वाढीव राज्य राखीव पोलीस दल, दंगल नियंत्रण पथक आणि जवानांचा बंदोबस्त देण्यात येईल. अवैध धंद्यावर करडी नजर ठेवली जाईल. भाविक व वाहनधारकांना कुठलाही त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल तसेच अतिक्रमणधारकांवर कारवाई होईल. साध्या वेशातील पोलीस देखील नवरात्र काळात निगराणी ठेवतील, असे त्यांनी सांगितले. या वेळी विश्वस्त बाळासाहेब दहिफळे, शशिकांत दहिफळे, देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, पोलीस कर्मचारी व देवस्थान कर्मचारी उपस्थित होते.

# स्नेहल सांगळे 'सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योग' राज्य उपसमितीवर

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

**'कामगारांच्या हितासाठी महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमात माझी निवड झाली, ही माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. समाजातील तळागाळातील कामगारांचे प्रश्न मांडणे हेच माझे ध्येय राहील.'**
स्नेहल सुरेंद्र सांगळे

राहुरी तालुक्यातील टाकळीमियां येथील सामाजिक कार्यकर्त्या व रमाई प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा स्नेहल सुरेंद्र सांगळे यांची महाराष्ट्र शासनाच्या कामगार आयुक्तालयाच्या 'सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योग' या मंडळाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीवर नाशिक विभागातून सदस्य म्हणून निवड झाली आहे.



ग्रामीण भागातील कामगार व उद्योग क्षेत्रातील प्रश्नांना प्राधान्याने वाचा फोडण्याची संधी मिळाल्याने सांगळे यांच्या नियुक्तीचे व्यापक स्वागत होत आहे. कामगार आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या शासकीय पत्राद्वारे ही नियुक्ती निश्चित झाली. संबंधित समितीचा उद्देश सिमेंट उद्योग व सिमेंटवर आधारित विविध उद्योगांतील कामगारांचे किमान वेतन निश्चित करणे तसेच त्यांच्या मूलभूत हक्कांबाबत शासनाला शिफारसी करणे असा आहे. महाराष्ट्र शासनाच्या या महत्त्वाच्या समितीत ग्रामीण भागातील स्थानिक सामाजिक नेतृत्वाचा समावेश झाल्याने कामगारांच्या समस्यांचे वास्तव चित्र शासनापर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ता. ८ सप्टेंबर रोजी मुंबईतील कामगार भवन येथे कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य तीमोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीस स्नेहल सांगळे उपस्थित राहून सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योग या विषयावर भूमिका मांडली. त्यांच्या निवडीमुळे सामाजिक वर्तुळात उत्साहाचे वातावरण असून विविध कामगार संघटना, शैक्षणिक संस्था, उद्योजक तसेच स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# कुस्ती स्पर्धेत विश्वजीत महारनवरला सिल्व्हर मेडल



**कोपरगाव । रिजवान शेख**

जंगली महाराज आश्रम, कोकमठाण येथे ता. १० रोजी पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत ३८ किलो वजन गटात पैलवान विश्वजीत महारनवर याने दमदार खेळ आणि चिकाटीच्या जोरावर द्वितीय क्रमांक पटकावत सिल्व्हर मेडल मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध नामांकित पैलवानांनी सहभाग घेतला होता. पहिल्याच फेरीपासून विश्वजीतने चपळाई, ताकद आणि अचूक डावपेच दाखवत प्रतिस्पर्ध्यांना धडकी भरवली. उपांत्य फेरीत प्रतिस्पर्ध्यावर मात करून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. अंतिम सामन्यातही जोरदार झुंज देत त्याने पराक्रम गाजवला आणि द्वितीय क्रमांकासह रौप्यपदकावर नाव कोरले. स्पर्धास्थळी उपस्थित प्रेक्षकांनी विश्वजीतच्या जिद्दी खेळाला भरभरून दाद दिली. आयोजक मंडळ व मान्यवरांनी त्याचा सत्कार करून अभिनंदन केले. या कामगिरीमुळे गावात आनंदाचे वातावरण असून नागरिक, नातेवाईक आणि मित्रपरिवाराने पै. विश्वजीत महारनवर याचे अभिनंदन केले आहे. स्थानिक क्रीडाप्रेमी व शिक्षकांनी सांगितले की, ''विश्वजीत हा मेहनती व जिद्दी खेळाडू असून सातत्यपूर्ण सराव व कठोर परिश्रमातून त्याने हे यश मिळवले आहे. भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावरही त्याच्याकडून अशीच चमकदार कामगिरी होईल, अशी अपेक्षा आहे.'' या यशाबद्दल विश्वजीत महारनवर यांनी आपल्या प्रशिक्षक, कुटुंबीय व मित्रांचे आभार मानले तसेच आगामी स्पर्धांमध्ये सुवर्णपदक पटकवण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला.



# पोस्ट ऑफिस अभिनव सेवा कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

स्व. मा. आमदार राजीव राजळे मित्र मंडळ, गदेवाडी यांच्या पुढाकारातून गदेवाडी येथे पोस्ट ऑफिसच्या अभिनव सेवा उपक्रम कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या कॅम्पला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून बोधेगाव मंडळ प्रमुख मा. संजय टाकळकर, बोधेगाव परिसरातील युवा नेतृत्व मा. पांडुरंग नवले, गदेवाडीचे सरपंच आसाराम मडके, तसेच शेवगाव पोस्ट ऑफिसचे प्रमुख विनायक शिंदे व त्यांच्या १४ जणांच्या टीमने मार्गदर्शन केले. कॅम्पदरम्यान सुकन्या समृद्धी योजना, लेक लाडकी योजना, मातृ वंदना योजना, महिला व नागरिक बचत योजना यासह विविध योजनांतर्गत खात्यांची उघडणी करण्यात आली.

तसेच पाच वर्षांपर्यंतच्या बालकांची मोफत आधार नोंदणी, आधार-मोबाईल लिंकिंग आणि नागरिकांना योजनांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली. आरोग्य विभागाच्या वतीने आयुष्यमान भारत योजनेची कार्डे काढण्याचे काम आरोग्य सेवक विठ्ठल खर्चन, कौशल्या खिळे व वंदना गजले यांनी पार पाडले. स्व. आ. राजीव राजळे मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कॅम्पमध्ये सक्रिय सहभाग घेत नागरिकांना आवश्यक सुविधा मिळवून दिल्या. या अभिनव उपक्रमामुळे गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# समता इंटरनॅशनलच्या साईश देवकरची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**कोपरगाव । किसन पवार**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात प्रोत्साहन देणाऱ्या समता इंटरनॅशनल स्कूलने पुन्हा एकदा कर्तृत्वाची शिखरे गाठली आहेत. या शाळेतील विद्यार्थी साईश निलेश देवकर याची प्रतिष्ठेच्या सीबीएसई क्लस्टर क्रिकेट साऊथ झोन-२ स्पर्धेतून राष्ट्रीय पातळीवरील क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नुकत्याच पार पडलेल्या १७ वर्षे वयोगटातील या स्पर्धेत तब्बल ७०० खेळाडू सहभागी झाले होते. त्यातून काट्याच्या चुरशीच्या निवड प्रक्रियेतून फक्त १८ खेळाडूंची राष्ट्रीय संघासाठी निवड झाली. या निवडीत ठसा उमटवत साईशला 'सदन स्ट्रायकर्स' या संघातून दिल्ली येथे होणाऱ्या सामन्यांमध्ये खेळण्याचा मान मिळाला आहे. साईशच्या यशामध्ये प्रशिक्षक अजिंक्य बोबडे, सनी धिवर तसेच क्रीडा विभाग प्रमुख रोहित महाले यांचे मोलाचे योगदान आहे. साईश हा सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक निलेश देवकर यांचा सुपुत्र आहे. शाळेचे संस्थापक काका कोयटे यांनी सांगितले की, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असून योग्य संधी आणि सक्षम मार्गदर्शन मिळाल्यास हे विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच चमकू शकतात. साईशची निवड ही समता परिवाराच्या शिक्षण व क्रीडा क्षेत्रातील बांधिलकीचे फलित आहे.'' कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे म्हणाल्या, ''साईशचे यश म्हणजे संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा असून भविष्यात तो नक्कीच राष्ट्रीय पातळीवर चमकणार आहे.'' तर शाळेचे प्राचार्य समीर अत्तार यांनी म्हटले की, ''साईशची निवड ही आमच्या शाळेसाठी अभिमानास्पद बाब असून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.'' साईशच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डाव्या विचारांची बुलंद तोफ कॉम्रेड सीताराम येचुरी

डाव्या विचासरणीचा बुलंद आवाज असे ज्यांचे वर्णन केले जाते ते कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार कॉम्रेड सीताराम येचुरी यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी १२ सप्टेंबर २०२४ रोजी सीताराम येचुरी यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ कायमची थंडावली. १२ ऑगस्ट १९५२ रोजी जन्मलेले सीताराम येचुरी हे भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थी दशेतच ते कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाले. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हैद्राबाद येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी त्यांनी दिल्ली गाठली. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्राची पदवी मिळवली. तिथेच ते स्टुडंट्स फ ेडरेशन ऑफ इंडियात सक्रिय झाले. या संघटनेचे ते तीन वेळा महासचिव बनले. पुढे त्यांना या संघटनेचे अध्यक्षपद मिळाले. त्यानंतर ते कम्युनिस्ट पक्षात सक्रिय झाले. कम्युनिस्ट पक्षात त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी अनेक आंदोलने केली. त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यांच्या या कार्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने त्यांना केंद्रीय सचिव पदावर काम करण्याची संधी दिली. १९९२ साली चेन्नई येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या १४ व्या काँग्रेसमध्ये त्यांची पक्षाच्या पॉलिट ब्युरो सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्यूरो सदस्य म्हणून त्यांनी भारतात कम्युनिस्ट पक्ष वाढवण्याचे मोठे कार्य केले. गावागावात, घराघरात कम्युनिस्ट पक्ष नेण्याचे प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांना पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यात मोठे यश मिळाले. या राज्यात कम्युनिस्ट पक्षाची सरकारे आली. संसदेतही कम्युनिस्ट पक्षाचे अनेक खासदार निवडून आले. सीताराम येचुरी हे स्वतः संसदेत निवडून गेले. संसदेतही त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडले. आपल्या बुलंद आवाजाने आणि अभ्यासपूर्ण भाषणाने त्यांनी संसद दणाणून सोडली. सीताराम येचुरी यांच्यावर पक्षाने अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या त्या त्यांनी लिलिया पेलल्या. त्यांनी पक्षाच्या आंतरराष्ट्रीय विभागाचे अध्यक्षपद सांभाळले. पक्षाचे मुखपत्र असलेल्या पीपल्स डेमॉक्रासी या नियतकालिकाचे संपादक पदही त्यांनी भूषवले. महाराष्ट्राचे प्रभारी पद ही त्यांनी सांभाळले. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यांच्या निधनाने केवळ डाव्या विचरसरणीचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकरी यांच्या हितासाठी आयुष्यभर झटणारा एक विचारवंत, तत्वनिष्ठ नेता देशाने गमवला आहे. त्यांची पक्षनिष्ठा आणि पक्षाच्या विचाराशी असलेली बांधिलकी हा राजकारणाचा क्षेत्रात आदर्श ठरणार आहे. राजकीय भुमिकांबाबत मतभिन्नता असूनही मनभेद असू नयेत अशी निखळ मानवतावादी वृत्ती जपणारे ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड सीताराम येचुरी यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**कॉम्रेड सीताराम येचुरी यांना लाल सलाम !! कॉम्रेड सीताराम येचुरी अमर रहे!!!**



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# कामगार चळवळीचे ज्येष्ठ कॉम्रेड मारुती आबा पाटील

कॉम्रेड मारुती आबा पाटील हे महाराष्ट्रातील कामगार चळवळीतील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ''सर्व श्रमिक संघ महाराष्ट्र राज्य'' या संघटनेने कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवला. ही संघटना १९७० च्या दशकात स्थापन झाली, जेव्हा महाराष्ट्रातील कामगार वर्ग अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींमध्ये अडकला होता. पाटील यांनी या संघटनेच्या माध्यमातून तळागाळातील कामगारांना संघटित करून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि संघटनेचा इतिहास कामगार अधिकारांसाठीच्या संघर्षाने भरलेला आहे. कॉम्रेड पाटील यांनी सुरुवातीपासूनच वाळू उपसा कामगार, रोलिंग मिल कामगार, कोतवाल, वनकामगार, ऊसतोड कामगार, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी आणि शासनाच्या बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांना संघटित केले. अंदाजे १५०० हून अधिक कामगार त्यांच्या प्रयत्नांतून संघटित झाले, ज्यामध्ये शेकडो कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी नोकरी मिळाली. त्यांच्या नेतृत्वामुळे कामगार वर्गाला सामाजिक ओळख आणि आर्थिक सुरक्षा मिळाली. संघटनात्मक कामकाजात त्यांनी अनेक अडचणींवर मात केली. स्थानिक प्रशासन, शासकीय अधिकारी आणि विरोधकांच्या दबावासमोरही त्यांनी एक तटस्थ, परंतु ठाम भूमिका घेतली. त्यांनी राजकीय हस्तक्षेप, स्थानिक गटबाजी आणि विरोधकांच्या अडचणींचा सामना करत कामगारांसाठी ठोस निर्णय घेतले. या संघर्षातून त्यांची धैर्यशीलता आणि नेतृत्वाची गुणवत्ता स्पष्ट झाली, ज्यामुळे कामगार संघटना ठोस पद्धतीने कार्य करू शकली आणि विरोधकांनाही सामोरे जाण्याची क्षमता निर्माण झाली. कॉम्रेड पाटील यांचे वैयक्तिक जीवनही प्रेरणादायी होते. त्यांनी नेहमी साधेपणा, संयम आणि समर्पणाचे मूल्य जपले. कोणत्याही वैयक्तिक लाभाशिवाय, समाज आणि कामगारांसाठी त्यांनी आपले जीवन अर्पण केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, प्रामाणिकपणा आणि न्यायप्रियता हे गुण कार्यकर्त्यांना आणि संघटनांना सातत्याने प्रेरित करत राहिले. अंगणवाडी व आशा कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. सेवा शर्ती सुधारणे, वेतनवाढ सुनिश्चित करणे आणि सामाजिक ओळख मिळवून देणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यांनी मंत्रालयात जाऊन प्रत्यक्ष संबंधित मंत्री, अधिकारी यांच्यासोबत संवाद साधून कामगारांसाठी सकारात्मक निर्णय घेण्यासाठी चर्चा केली. यामुळे या कर्मचाऱ्यांचे पगार नियमित राहिले आणि सेवा शर्ती सुधारण्यात मोठा बदल झाला. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी वयोमानाचा विचार न करता कामगारांसाठी सक्रिय भूमिका बजावली. त्यांनी शासकीय कार्यालयांना भेट दिली, समस्या नोंदवल्या आणि कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक मदत सुनिश्चित केली. या काळात त्यांच्या प्रयत्नांमुळे कामगारांनी संकटाचा सामना यशस्वीरित्या केला, ज्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची खरी छटा स्पष्ट झाली. कॉम्रेड पाटील यांचे नेतृत्व फक्त संघटनात्मक नव्हते, तर ते मानसिक दृष्ट्या देखील अत्यंत सक्षम होते. त्यांनी कामगार चळवळीतील तणाव, राजकीय अडचणी आणि विरोधकांच्या संघर्षात संयम राखला. त्यांच्या कार्यपद्धतीत 'साधेपणा आणि अखंडता' हे तत्त्व कायम होते. यामुळे कामगार वर्गात त्यांच्यावर प्रगाढ विश्वास निर्माण झाला आणि संघटनेतील पिढ्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेरित राहिल्या. ग्रामीण भागातील कामगारांचे जीवनमान सुधारण्यासही त्यांचा मोठा वाटा होता. कोतवाल, वनकामगार, ऊसतोड कामगार यांसारख्या कामगारांना स्थिर नोकरी मिळवून देणे, हक्कांबाबत जागरूकता वाढवणे आणि आर्थिक सुरक्षा सुनिश्चित करणे हे त्यांच्या कार्याचे ठळक परिणाम ठरले. त्यांचे नेतृत्व या कामगार वर्गासाठी मार्गदर्शक ठरले आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे कामगारांनी समाजात आपली उपस्थिती ठामपणे निर्माण केली. कॉम्रेड पाटील यांचा प्रभाव फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता; त्यांच्या कार्यपद्धतीने इतर राज्यांतील कामगार संघटनांनाही मार्गदर्शन मिळाले. विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये आणि मार्गदर्शन बैठका आयोजित करून त्यांनी कामगार चळवळीतील नव्या पिढीला नेतृत्व शिकवले. त्यांच्या अनुभवातून अनेक संघटना सक्षम झाल्या आणि कामगार वर्गाची सामाजिक व आर्थिक जागरूकता वाढली. आज कॉम्रेड मारुती आबा पाटील यांचे निधन फक्त संघटनेसाठीच नव्हे, तर संपूर्ण कामगार चळवळीसाठी मोठे नुकसान आहे. त्यांच्या अनुभवाचा, साहसाचा आणि नेतृत्वाचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत राहील.



**गुरुदत्त वाकदेकर**
विशेष प्रतिनिधी,
रयत समाचार, मुंबई

स्मृतिवार्ता

# सुजय विखे यांच्या भयमुक्ती निर्धाराची जिल्ह्याला प्रतीक्षा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

गुन्हेगार कितीही मोठा असला तरी आपण त्याला हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. शासनाने गुंडांच्या विरोधात भूमिका घेतलेली आहे. अगोदर शिर्डी आणि नंतर अहिल्यानगर भयमुक्त करू या डॉ. सुजय विखे यांनी केलेल्या निर्धाराची जिल्ह्यातील जनतेला आता प्रतीक्षा आहे. काही गुंडांनी शिर्डीत सुजय विखे यांच्या फलकाची नासधूस केल्यानंतर विखे यांनी हा भयमुक्तीचा निर्धार केला आहे. सुरक्षितते संदर्भात अहिल्यानगर जिल्ह्याला कुणी वाली राहिला नाही. जिल्हा सर्वच बाबतीत आता लावारिस झाला आहे. अशा अनेकदा नागरिकांमध्ये चर्चा झडत असतात. अशा परिस्थितीत जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने राधाकृष्ण विखे यांच्यासह सुजय विखे यांच्यावरही जनतेच्या सुरक्षिततेसह महिला भगिनींच्या भयमुक्तीचे दायित्व आहे. राधाकृष्ण विखे यांचे श्रीरामपूर वर आजपर्यंत विशेष लक्ष राहिले आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांचाही येथे मोठा संच आहे. शहराची अलीकडे सुरक्षिततेबाबत सर्वत्र नाचक्की झाली आहे. शहरातील स्वयंवर मंगल कार्यालयातही सुजय विखे यांनी महिला भगिनींना मोठा दिलासा दिला होता. त्या निर्णयाचे महिला भगिनींनी सुजय विखे यांचे मनापासून आभारही मानले होते. रात्री अपरात्री महिला भगिनी श्रीरामपूर शहरात कोणत्याही परिसरात एकट्या फिरतील अशा प्रकारची सुरक्षा हमी मी देतो अशी सुजय विखे यांनी घोषणा केली होती. मात्र लिहिण्यापूर्वी शाई सुकावी अशा प्रकारची ही घोषणा हवेत विरली. सुजय विखे यांनी पाठ फिरवताच शहरात चैन स्नेकिंग आणि गावठी कट्ट्यांनी हैदोस घातला. शिर्डीत दिवसा कोणताही गुंड कोणतेच कृत्य करणार नाही. गुंड हे रात्रीचेच काम करतात.

गुंड हा कितीही मोठा असला तरी मी त्याला हद्दपार केल्याशिवाय राहणार नाही. शासनाने गुंड प्रवृत्तीच्या विरोधात भूमिका घेतलेलीच आहे, अशी भीष्मप्रतिज्ञा सुजय विखे यांनी शिर्डीत केली आहे. अगोदर शिर्डी आणि नंतर अहिल्यानगर भयमुक्त करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. सर्वसामान्य व्यापारी जनता महिला या निर्णयामुळे सुखावले असून सुजय विखे या निर्धाराला सुरुवात करून कधी शेवट करतात या क्षणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे आणि विशेषतः श्रीरामपूर शहराचे लक्ष लागले आहे. विखे पिता पुत्र जे बोलतात ते करून दाखवतात अशी त्यांची ख्याती आणि आजपर्यंतची अनेक उदाहरणे आहेत. आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती तसेच नगरपालिकेच्या निवडणुकीत अगोदर विखे यांना या निर्धाराची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. श्रीरामपूर शहरात विखे पिता पुत्रांना मानणारा मोठा वर्ग आहे. शहरातील जनतेचा त्यांच्यावर मोठा विश्वास ही आहे. दरम्यान सुजय विखे या निर्धाराला कशी चालना देतात याकडे आता शिर्डी आणि संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.





# तुळजाभवानी पालखीचे सोनईत आज आगमन

**नेवासा । विजय खंडागळे**

महाराष्ट्राचे कुलदैवत श्री क्षेत्र तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेसो की पालखीचे आगमन आज दुपारी एक वाजता सोनई येथील तुळजाभवानी मंदिरात होणार आहे. या आगमनानिमित्त परिसरातील भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तुळजाभवानी मंदिर ट्रस्टतर्फे तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केले आहे. पालखी विधी सोहळ्यांत देवीची मुख्य आरती व विधिवत पूजन करून पालखीचे प्रस्थान करण्यात येईल. पालखीचे आगमन शिवाजी चौकातून तुळजाभवानी मंदिरापर्यंत भव्य मिरवणुकीसह होणार असून तेथून सोनई पेठेतून जेऊरकडे (ता. नगर) मार्गस्थ होईल. तुळजाभवानी मातेस भक्तिभावाने वंदन करून दर्शनाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कबड्डी स्पर्धेत आबासाहेब काकडे विद्यालयाची चमकदार कामगिरी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शिवाजी हायस्कूल, बोधेगाव येथे ता. ८ ते १० सप्टेंबर २०२५ या कालावधीत पार पडलेल्या तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेवगावच्या विद्यार्थ्यांनी दमदार खेळ सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विद्यालयाच्या संघाने सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले. याच गटातील मुलींच्या संघानेही शर्थीचा खेळ करत द्वितीय क्रमांक मिळवला. खेळाडूंच्या या यशामागे क्रीडा शिक्षक भागवत कल्पेश, संतोष ढोले, सचिन वाल्हेकर व विक्रम घुटे यांच्या अथक परिश्रमाचे मोलाचे योगदान असून त्यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी विजयाचा मान पटकावल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे प्रमुख डॉ. ॲड. विद्याधर काकडे, सहप्रमुख हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, विश्वस्त पृथ्वीसिंग काकडे, शालेय शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, अशोक आहेर, विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक रवींद्र आगळे यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व पालकांनी विजेत्या खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आबासाहेब काकडे विद्यालयाच्या या यशामुळे शेवगाव तालुक्याचा क्रीडारंग उजळून निघाला आहे.





# अभियंता पतसंस्थेचे कार्य पारदर्शक– इंजी. लांडगे

**अहमदनगर । विजय मते**

शासकीय सेवेतील अभियंत्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगरची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच माऊली संकुल येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक व आजीव अध्यक्ष इंजी. रो.मा. लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

सभेस मुख्य अभियंता इंजी. हनुमंत धुमाळ, सेवानिवृत्त मुख्य अभियंता इंजी. एम.के. पोकळे, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता इंजी. एम.पी. खाडे, इंजी. बी.एन. बहिर, कार्यकारी अभियंता इंजी. बी.एन. खर्डे, इंजी. पी.एन. थोरात, इंजी. व्ही.टी. शिंदे आदी मान्यवरांसह सभासदांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या प्रसंगी गुणवंत पाल्यांचा तसेच सेवानिवृत्त व पदोन्नती प्राप्त सभासदांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जलसंपदा विभागातील निवृत्त सचिव व संस्थेचे मुख्य प्रवर्तक, आजीव अध्यक्ष इंजी. रो.मा. लांडगे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त संस्थेच्या वतीने मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. सभेच्या प्रारंभी चेअरमन इंजी. प्रल्हाद पाठक यांनी प्रास्ताविक करून वार्षिक कामकाजाचा सविस्तर अहवाल सादर केला. त्यांनी लांडगे साहेबांच्या आदर्श कार्यपद्धतीमुळे संस्थेने साधलेली सातत्यपूर्ण प्रगती अधोरेखित केली. तसेच संस्थेचे माजी आदर्श चेअरमन व विद्यमान तज्ज्ञ संचालक इंजी. रविंद्र देशमुख यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करून सर्व सेवानिवृत्त सभासदांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या वार्षिक सभेत विषयपत्रिकेतील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होऊन त्यांना एकमुखी मान्यता देण्यात आली. सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना चेअरमन इंजी. प्रल्हाद पाठक व व्यवस्थापक व्ही.एस. रक्ताटे यांनी समाधानकारक उत्तरे दिली. मार्गदर्शनपर भाषणात इंजी. रो.मा. लांडगे यांनी संस्थेच्या पारदर्शक व सभासदाभिमुख कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. भविष्यात संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. सभेच्या शेवटी व्हा. चेअरमन इंजी. अभिजित देशमुख यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन संचालक इंजी. दादाभाऊ करंजुळे यांनी केले.





# प्राचार्य जठार व पत्रकार कुरुमकर यांचा सन्मान

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

लोणी व्यंकनाथ येथील राजे उमाजी नाईक संघटना व मित्र मंडळाच्या वतीने श्री व्यंकनाथ विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जठार व ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांचा कृतज्ञता सन्मान करण्यात आला. प्राचार्य बाळासाहेब जठार हे शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. समाज जडणघडणीत त्यांनी मोलाचे योगदान दिले असून ते उत्तम वक्ते आणि वृक्षप्रेमी आहेत. २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. इतिहास, भूगोल आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय नेत्यांच्या जयंती सोहळे तसेच सामाजिक उपक्रमांत त्यांच्या व्याख्यानांद्वारे त्यांनी समाजजागृती केली आहे. समता आणि प्रगतीचा संदेश देणारी त्यांची भूमिका ही तरुणांसाठी मार्गदर्शक ठरली असल्याचे मत भानुदास खंडागळे यांनी व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांचा गौरव करताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, ''बहुजन समाजासाठीची त्यांची पत्रकारिता प्रेरणादायी ठरत आहे. संघर्षातून उभे राहिलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासू असून त्यांच्या लिखाणातून समाजातील प्रत्येक घटकाला संजीवनी मिळते. समता, शांतता आणि कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी त्यांनी सदैव समाजाभिमुख पत्रकारिता केली आहे.'' या कार्यक्रमास राजे उमाजी नाईक संघटनेचे पदाधिकारी बंडूपंत खंडागळे, विशाल शिंदे, रवींद्र चव्हाण, वैभव खंडागळे, भानुदास खंडागळे, दत्ता मदने, व्यंकनाथ विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक प्रतीक इथापे, कनिष्ठ लिपिक प्रज्ञा राहींज, एकनाथ नेटवटे आदी मान्यवर उपस्थित होते.



